लोकमत

# ठेवीदारांच्या शपथपत्रावरून सरकार व बचाव पक्षात खडाजंगी

## एलसीबीच्या तत्कालिन निरीक्षकाच्या चौकशीची मागणी

■ लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव/पुणे : बीएचआर प्रकरणात न्यायालयात युक्तीवाद सुरु असताना शपथ पत्रावरुन विशेष सरकारी वकील प्रवीण चव्हाण व बचावपक्षाचे वकील उमेश रघुवंशी यांच्यात खडाजंगी झाली.

युक्तीवादात ॲड.चव्हाण यांनी सांगितले की, विवेक ठाकरे यांच्यात टेम्परींग करण्याची ताकद आहे. पोलीस कोठडीत असताना त्यांनी ठेवीदारांची ९ शपथपत्रे करुन घेतली. यावर आरोपीचे वकील उमेश रघुवंशी यांनी आक्षेप घेतला. कोठडीत असताना कसे काय हे करु शकतो. पोलिसांनी इतरांशी बोलायला सवलत दिली होती का? असा आक्षेप नोंदविला. आम्ही ठेवीदारांकडे गेलो नाही. ते आमच्याकडे आले होते, असे सांगितले. दोन्ही वकिलांमध्ये बराचवेळ शाब्दीक खडाजंगी झाली. बीएचआर प्रकरणात अटक झालेल्या पाचही संशयित आरोपींना पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर रविवारी पुण्याच्या न्यायालयात हजर करण्यात आले. बचाव पक्षाच्या वकिलांच्या आक्षेपावर ॲड.चव्हाण यांनी सांगितले की, पुण्यातील लोक जळगावला गेले नव्हते. तुम्ही सारसबागेत आला होता. बनावट वेबसाईट बनविणाऱ्याची माहिती मिळाली आहे. महावीर जैन यांची नेमणूक केली नसताना त्याचे मानधन कंडारे याने कसे काय दिले. यामुळे महावीर जैन यांची संपूर्ण कृती संशयास्पद दिसून येते. आरोपींना वाचविण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सुनील कुराडे यांच्यासह सर्वांची चौकशी करायची आहे. हा सर्व कटकारस्थानाचा भाग आहे. २ ते ३ व्यक्तिंचे जबाब नोंदविण्यात आले आल्याचे त्यांनी सांगितले.